श्रीक्षेत्र नारायणगड , ता. जि.बीड या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयातील कामांस प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
शासन निर्णय क्रमांकः तिर्थवि-२०१७/प्र.क्र.१७३/योजना-६

बांधकाम भवन, २५ मर्झबान मार्ग,
फोर्ट, मुंबई-४०० ००१
तारीखः १४ फेब्रुवारी, २०१८

वाचा :-

१) जिल्हाधिकारी, बीड यांचे पत्र क्रमांकः जिनिस/क्र.१६८/पर्यटन- तिर्थक्षेत्र/२०१७-१८, दिनांक २३.५.२०१७ अन्वये सादर केलेला प्रस्ताव

२) नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांकः तीक्षेवि-२०१५/प्र.क.६/१४४४, दि. ४ जून २०१५

३) मा.मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समितीच्या दिनांक ७ ऑक्टोबर २०१७ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

४) मा.मुख्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीच्या दिनांक ९ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या बैठकीचे इतिवृत्त

प्रस्तावना :-

श्रीक्षेत्र नारायणगड , ता. जि. बीड या तीर्थक्षेत्राच्या विकास आराखडयास निधी उपलब्ध करुन देणेबाबत स्थानिक विधानसभा सदस्यांनी मा.मुख्यमंत्री महोदयांना विनंती केली होती. त्यानुसार जिल्हाधिकारी, बीड यांनी जिल्हास्तरीय समित्यांच्या मान्यतेने श्रीक्षेत्र नारायणगड , ता. जि. बीड या तीर्थक्षेत्राच्या विकासाचा एकूण रु.२५००.०० लक्ष इतक्या किंमतीचा आराखडा शासन मान्यतेसाठी सादर केला होता.

२. सदर आराखडयातील एकूण रु. २५००.०० लक्ष इतक्या किंमतीच्या कामांच्या प्रस्तावास व खर्चास नियोजन विभाग शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क्र.६/का-१४४४, दिनांक ४ जून २०१५ मधील तरतूदींनुसार मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चाधिकार समिती व मा.मुख्यमंत्री यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय शिखर समितीने मान्यता दिली आहे. त्यानुसार सदर आराखडयातील रु.२५००.०० लक्ष एवढया अंदाजपत्रकीय किंमतीच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन निधी वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

जिल्हाधिकारी, बीड यांनी सादर केलेल्या व राज्यस्तरीय समित्यांनी मान्यता दिलेल्या श्रीक्षेत्र नारायणगड , ता. जि.बीड या तीर्थक्षेत्राच्या आराखडयातील एकूण रु. २५००.०० लाख (रुपये पंचवीस कोटी फक्त) इतक्या किंमतीच्या खालील कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ.क्र.	कामे	अंदाजपत्रकीय रक्कम	प्रशासकीय मान्यता रक्कम
१	अ) मंदिर परिसरात दगडी फरशी बांधकाम ब) वेस (प्रवेशद्वार) सुंदर असे वास्तूशिल्प- चारही दिशांना क) लँडस्केप	रु.३.०० कोटी	रु.३.०० कोटी
२	सार्वजनिक शौचालय अ) पुरूषांसाठी (२५क्षमता) ब) स्त्रियांसाठी (२५ क्षमता)	रु.०.८० कोटी	रु.०.८० कोटी
३	पाणी व जलव्यवस्थापन अ) पाण्याची टाकी ब) पाईपलाईन व उपांग दूरूस्तीची कामे क) जलसंवर्धन कामे	रु.३.४५ कोटी	रु.३.४५ कोटी
४	वाहनतळ अ) सिमेंट कॉंक्रीट- वाहनतळ ब) बस स्टँड	रु.१.५० कोटी	रु.१.५० कोटी
५	विद्युतीकरण अ) तीन ट्रान्सफॉर्मर (१०० KVA) एक स्वतंत्र बे, ६.०० किमी L.T. Line २.७० किमी H.T. Line ब) अंतर्गत व बाह्य सौर पथदिवे उभारणी व भक्त निवास सोलार वॉटर हिटर	रु.०.५९ कोटी रू. ३.३० कोटी	रु.०.६६४८ कोटी रू. ३.३० कोटी
६	भक्त निवास अ) भक्त निवास (१००० व्यक्ती) ब) चार कक्षांचे विश्रामगृह क) गरम व थंड पाणी व्यवस्था(RO Filter सहीत)	रू. ३.०० कोटी	रू. ३.०० कोटी
७	सांस्कृतिक सभागृह (२५००० क्षमता)	रू. ३.०० कोटी	रू. ३.०० कोटी
८	दोन प्रसादालय (२००० क्षमता प्रत्येकी)	रू. २.०० कोटी	रू. २.०० कोटी
९	गोशाळा (१००० पशू)	रू. १.०० कोटी	रू. १.०० कोटी
१०	मंदिरातील गाभा-यांचे live video दर्शनासाठी LED Screen बसविणे	रू. ०.५० कोटी	रू. ०.५० कोटी
११	Public address system व CCTV speaker	रू. ०.५० कोटी	रू. ०.५० कोटी

अ.क्र.	कामे	अंदाजपत्रकीय रक्कम	प्रशासकीय मान्यता रक्कम
१२	पोलीस मदत केंद्र (महीला व पूरूष स्वतंत्र)	रू. ०.३० कोटी	रू. ०.३० कोटी
१३	अ) सामानाकरिता डिजिटल लॉकर ब) चप्पल स्टँड	रू. ०.२० कोटी	रू. ०.२० कोटी
१४	पाय धूवून मंदिरात जाता येईल अशी व्यवस्था	रू. ०.१५ कोटी	रू. ०.१५ कोटी
१५	दिशादर्शक माहिती फलक	रू. ०.०५ कोटी	रू. ०.०५ कोटी
१६	रेस्टॉरंट , विक्री केंद्रे व वस्तू संग्रहालये	रू. १.५० कोटी	रू. १.५० कोटी
१७	घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापन	रू. ०.१६ कोटी	रू. ०.१६ कोटी
	एकूण	**रु. २५.०० कोटी**	**रु. २५.०० कोटी**

२. ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता अनुदान (रु.२ कोटी ते रु.२५ कोटीपर्यंत) या योजनेअंतर्गत राज्यातील ग्रामीण तीर्थक्षेत्रांना निधी वितरीत करण्यासाठी सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात एकूण रु.५०५०.०० लाख इतका निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर अर्थसंकल्पीत निधीतून प्रशासकीय मान्यता दिलेल्या निधीपैकी प्रथम टप्प्यात रु. २.०० कोटी (रुपये दोन कोटी फक्त) इतका निधी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे वितरीत करण्यात येत आहे.

३. जिल्हाधिकारी, बीड यांनी प्रशासकीय मान्यता दिलेल्या कामांपैकी, कामांचा प्राथम्यक्रम निश्चित करावा व तद्नंतरच सदर का़मांवर निधी खर्च करण्यात यावा.

४. सदर निधी आहरण करुन संबंधित कार्यान्वयीन यंत्रणेला वितरीत करण्यासाठी जिल्हा नियोजन अधिकारी/ सहाय्यक जिल्हा नियोजन अधिकारी, बीड यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. तसेच जिल्हाधिकारी, बीड यांना नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. सदर कामांचे नियोजन व खर्चाचे सनियंत्रण, नियोजन विभाग, शासन निर्णय क्रमांक तीक्षेवि-२०१५/प्र.क.६/१४४४, दिनांक ४ जुन २०१५ अन्वये गठीत करण्यात आलेल्या जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा़स्तरीय कार्यकारी समितीकडे सोपविण्यात येत आहे. समितीची कार्यकक्षा शासन निर्णयात नमूद केल्यानुसार राहिल.

६. जिल्हास्तरीय कार्यकारी समितीने कामांच्या अंमलबजावणीसाठी संबंधीत कार्यान्वयीन यंत्रणांशी समन्वय साधावा व कामे विहीत कालावधीत पूर्ण होण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात.

७. सदर कामांच्या अंदाजपत्रकांना सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक मान्यता असल्याची खात्री करावी. तसेच सदर कामांची देखभाल दुरुस्ती देवस्थान ट्रस्ट/जिल्हा परिषद/ग्रामपंचायत यांनी करावी.

८. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येणारा निधी मागणी क्र. मागणी क्रमांक एल-३-२५१५-इतर ग्राम विकास कार्यक्रम-१९६-जिल्हा परिषद/ जिल्हास्तरीय पंचायतींना सहाय्य (००) (०७) ग्रामीण भागातील तीर्थक्षेत्रांच्या विकासाकरीता अनुदान (रु.२ कोटी ते रु.२५ कोटीपर्यंत) (२५१५२५२१)-३१-सहायक अनुदाने (वेतनेतर) (दत्तमत) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व सदर लेखाशीर्षाखाली उपलब्ध असलेल्या सन २०१७-२०१८ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतूदीतून भागविण्यात यावा. प्रकरणी कोणत्याही प्रकारची अनियमितता होणार नाही, याची सर्व संबंधितांनी दक्षता घ्यावी, अन्यथा शासन स्तरावरून निधी वसूली, कारवाई, इ. बाबी केल्या जातील.

९. सदर वितरण सुधारित मासिक विवरणपत्राच्या मर्यादेत आहे.

१०. सदर निधी वितरीत करतांना वित्त विभागाचे परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल २०१७ मधील अटी व शर्तींचे पालन करण्यात आले आहे.

११. सदर शासन निर्णय वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक क्र.अर्थसं-२०१७/प्र.क्र.७५/ अर्थ-३, दिनांक १८ एप्रिल २०१७ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

१२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०२१४१६२२२७७३२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Manoj D Jadhav

Digitally signed by Manoj D Jadhav
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RDD, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a83fc829949e9b1a022b031436c946028b48d51f5a1bf36ca3ce4fead857da72, cn=Manoj D Jadhav
Date: 2018.02.14 18:07:29 +05'30'

(मनोज जाधव)

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मुख्यमंत्री यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई
२. मा.मंत्री (वित्त) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. मा.मंत्री (ग्रा.वि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई

४. मा.राज्यमंत्री (ग्रा.वि.).यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
६. महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१, मुंबई / महाराष्ट्र-२ नागपूर
७. मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
९. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
१०.प्रधान सचिव (बांधकाम), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
११.सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, मंबई
१२.विभागीय आयुक्त, आयुक्त कार्यालय, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद
१३.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
१४.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बीड
१५.मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद , बीड
१६.अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, बीड
१७.जिल्हा कोषागार अधिकारी, बीड
१८. नियोजन विभाग (का.१४७४/१४४४) मंत्रालय, मुंबई-३२.
१९.वित्त विभाग (व्यय -१५, अर्थसंकल्प-१६/१७), मंत्रालय, मुंबई ३२.
२०.कक्ष अधिकारी, कार्यासन क्र.वित्त-७, वित्त-१, वित्त-८, ग्राम विकास व जलसंधारण विभाग
२१. निवड नस्ती (का.यो-६). ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.